**निशाणी क्र. पी –१३/पी. डब्लयु. १**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

नावः आनंद रामहित सोनी

वयः ३२ वर्षे, धंदाः कलर काम,

पत्ताः बोईसर, ता.जि.पालघर

**<u>अभियोग पक्षातर्फे विशेष अभियोक्ता श्री. आर.बी.संखे यांच्यामार्फत साक्षीदाराचा सरतपास शपथेवर सुरु</u>**

१. दिनांक ११.०१.२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास, बोईसर येथील जामा मस्जीदच्या समोर आयसीआयसीआय च्या एटीएम जवळ चहा व नाष्ट्याचे दुकान आहे, तेथे आम्ही उभे होते. तेथे पोलीस आले. त्यांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले. सेक्यूरिटी गार्ड राणे यांनी घटनास्थळ दाखवले. घटनास्थळ हे पाठक निवास बिल्डींग, गाळा क्र. २ येथील एटीएम होते. तेथे दोन एटीएम होते. तेथे पाहिले असता एटीएमचा खालील बाजूचा टिन बॉक्स पडला होता. तेथे पोलीसांनी पंचनामा केला. पोलीसांनी फोटो काढले. माझी पंचनाम्यावर सही घेतली. त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच गगन झा हा हजर होता. आता मला दाखविलेला पंचनामा तोच आहे. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूर मराठीत असून मला तो मजकूर हिंदी भाषेत समजावून सांगितला. सदरचा मजकूर बरोबर आहे. (पंचनाम्याला **<u>नि.क्र. पी –१४/पी. डब्लयु.१</u>** देण्यात येत आहे.) आता मला दाखविलेले फोटो तेव्हा काढलेले होते. सदर फोटोमध्ये मी आहे व चहा नाष्ट्याचे दुकान आहे. (सदर फोटोला **<u>ओळखीपूरते नि.क्र. पी –१५ व पी–१६/पी. डब्लयु.१</u>** देण्यात येत आहे.)

२. दिनांक २८.०२.२०२३ रोजी मला पोलीसांनी पोलीस चौकीत बोलविले होते. पेन ड्राईव्ह आणला होता. त्याच्या जप्तीसाठी मला बोलविले होते. दुपारी अंदाजे ११.०० वाजताच्या सुमारास मी गेलो होतो. तेथे एक जण पेन ड्राईव्ह घेवून आला होता व त्यातील व्हीडीओ दाखवत होता. पोलीसांनी पेन ड्राईव्ह कॉम्प्यूटर मध्ये लावला. त्यामध्ये व्हीडीओ होता. व्हीडीओ चालविला होता. व्हीडीओ चालू होता पण मी एवढे लक्ष दिले नाही. तो व्हीडीओ एटीएम बद्यल होता. व्हीडीओ चालविल्यानंतर पोलीसांनी पंचनामा केला व माझी सही घेतली. आता मला दाखविलेला पंचनामा तोच आहे. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूर मराठीत असून मला तो मजकूर हिंदी भाषेत

समजावून सांगितला. सदरचा मजकूर बरोबर आहे. (जप्ती पंचनाम्याला **नि.क्र. पी –१७/पी. डब्लयु.१** देण्यात येत आहे.) सदर पेन ड्राईव्ह मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविलेला निशाणीवर लेबल आहे, त्या लेबलवर माझी सही अनुक्रमांक १ वर आहे. (सदर लेबल सहित असलेल्या लखोट्याला **नि.क्र. पी –१८/पी. डब्लयु.१** देण्यात येत आहे.) दोन वर्ष होवून गेल्याने पेन ड्राईव्ह दाखविल्यास मी ओळखू शकत नाही. तसेच व्हीडीओ पाहताना मी एवढे लक्ष दिले नव्हते. (पेन ड्राईव्ह मधील मजकूरासाठी अद्याप भारतीय पूरावा कायदा कलम ६५ बी प्रमाणे प्रमाणपत्र दाखल नाही.)

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी तर्फे वकील श्री. एच.जी.म्हात्रे यांचे मार्फत उलटतपास –**

३. पंचनाम्याला हजर होण्यासाठी मला पोलीसांनी लिखीत स्वरूपात सुचना दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या गुन्ह्यात बोलविले, मला तो गुन्हा क्रमांक माहित नाही. पोलीसांनी २–३ सह्या घेतल्या असाव्यात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी एकदाच बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, व्हीडीओ मध्ये कोण आहे हे मला माहित नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझे लक्ष नव्हते. पेन ड्राईव्हच्या आत कोणत्या फाईल होत्या हे मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, नॉर्मल पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, पेन ड्राईव्ह किती जीबीचा आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्या सॉफ्टवेअरने फाईल काढली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, फाईलचे हॅश व्हॅल्यू मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सांगितले पंचनाम्यावर सही कर म्हणून मी पंचनाम्यावर सह्या केल्या.

४. एटीएम पूर्व–पश्चिम असे होते. हे म्हणणे खरे आहे की, एटीएमची जागा मला परिचीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबद्यल माहिती नाही, पंचनामा करून माझ्या फक्त सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR

Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Date: 2025.12.23 16:34:45 +0530

दिनांक २३/१२/२०२५. **(श्रीमती पी. एस. जी. चाळकर)**

पालघर. २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालघर.